Test Booklet Code & Serial No.

प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

| **B** |
|---|

# Paper-II

# HISTORY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

   (Name) ................................................

2. (Signature) .........................................

   (Name) ................................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# APR - 10224

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

# History
## Paper II
# इतिहास
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. In 1077, which Chola king sent a delegation of 72 traders to China ?
   (A) Rajendra I
   (B) Kulottunga
   (C) Rajadhiraja
   (D) Vikrama

1. इ.स. 1077 मध्ये कोणत्या चोल राजाने 72 व्यापाऱ्यांचे एक शिष्टमंडळ चीनला पाठवले ?
   (A) राजेंद्र I
   (B) कुलोत्तुंग
   (C) राजाधिराज
   (D) विक्रम

2. 'Periya Puranam' is a revered book of ................ cult.
   (A) Shaiva
   (B) Vaishnava
   (C) Shwetambara
   (D) Vajrayana

2. 'पेरिय पुराणम' हा कोणत्या पंथाचा आदरणीय ग्रंथ मानला जातो ?
   (A) शैव
   (B) वैष्णव
   (C) श्वेतांबर
   (D) वज्रयान

3. Which option is an incorrect description of Kanchipuran ?
   (A) Centre of textile industry
   (B) Centre of Buddhist, Jain, Vaishnav, Shiva thoughts
   (C) Near the Neerpetthuru Port
   (D) Brihadeshwar Temple Site

3. कांचीपूरमबाबत कोणता पर्याय चूक आहे ?
   (A) वस्त्रोद्योग केंद्र
   (B) बौद्ध, जैन, वैष्णव, शैव विचारांचे केंद्र
   (C) नीरपेथ्थुरू बंदराच्या जवळ
   (D) बृहदेश्वर मंदिर

4. Which doab region is also known as Vengi ?
   (A) Krishna–Kaveri
   (B) Krishna–Godavari
   (C) Godavari–Kaveri
   (D) Krishna–Mahanadi

5. Which King has been mentioned in the Prayaga Prashasti of Samudragupta ?
   (A) Simhavishnu
   (B) Narsimhavarman I
   (C) Parmeshwarvarman II
   (D) Vishnugopa

6. Which Kingdoms wex defeated by Pulakeshi II according to the Aihole Prashasti ?
   (A) Kadamba, Pallava, Chola
   (B) Kadamba, Harsha, Pala
   (C) Kadamba, Pallava, Ganga
   (D) Ganga, Harsha, Chola

7. Why is Kulottunga Chola called as 'Sugama Tavirta Chola' ?
   (A) He abolished customs tax
   (B) He patronised music
   (C) He banned the foreign traders
   (D) He built cities

4. वेंगी नावाने कोणता दुआब प्रसिद्ध आहे ?
   (A) कृष्णा–कावेरी
   (B) कृष्णा–गोदावरी
   (C) गोदावरी–कावेरी
   (D) कृष्णा–महानदी

5. समुद्रगुप्ताच्या प्रयागप्रशस्तीमध्ये कोणत्या राजाचा उल्लेख येतो ?
   (A) सिंहविष्णू
   (B) नरसिंहवर्मन I
   (C) परमेश्वरवर्मन II
   (D) विष्णूगोप

6. ऐहोळे प्रशस्तीनुसार द्वितीय पुलकेशीने कोणत्या राज्यांचा पराभव केला ?
   (A) कदंब, पल्लव व चोल
   (B) कदंब, हर्ष व पाल
   (C) कदंब, पल्लव व गंग
   (D) गंग, हर्ष व चोल

7. 'सुगम तावित चोल' असे कुलोत्तुंग चोल राजास का म्हणता ?
   (A) सीमाशुल्क रद्द केले
   (B) संगीत कलेला प्रोत्साहन दिले
   (C) परदेशी व्यापाऱ्यांवर बंदी घातली
   (D) नगरांची उभारणी केली

8. The assembly in Chola Kingdom that looked after the village administration in the villages occupied by farmers was called as :
   (A) Cheri
   (B) Nadu
   (C) Ur
   (D) Sabha

9. What is Eripatti ?
   (A) Forest Land
   (B) Land under reservoir
   (C) Land with a well
   (D) Fallow Land

10. Which statement about the Kailasnatha temple constructed by Narasimhavarman II is incorrect ?
   (A) Kailasanath temple was constructed at Kanchiparam
   (B) The construction was an indication of the rising influence of Buddhism on the State
   (C) This was a victory symbol of a long-drawn war for the king
   (D) There was a mixture of different artistic styles

8. चोल राज्यातील शेतकऱ्यांचा वस्त्या असलेल्या खेड्यातील कारभार पाहणारी संघटना म्हणजे :
   (A) चेरी
   (B) नाडू
   (C) उर
   (D) सभा

9. एरीपट्टी म्हणजे काय ?
   (A) जंगल जमीन
   (B) तलावाची जमीन
   (C) विहीर असलेली जमीन
   (D) पडीक जमीन

10. नरसिंहवर्मन II ने बांधलेल्या कैलासनाथ मंदिराबद्दल खालीलपैकी कोणता पर्याय यथातथ्य नाही ?
   (A) कैलासनाथ मंदिर कांचीपूरम येथे बांधले
   (B) राज्यावर बौद्ध धर्माचा प्रभाव वाढत असल्याचे हे प्रतीक होते
   (C) राजाच्या दीर्घयुद्धाचे हे विजयचिन्ह होते
   (D) येथे विविध कला शैलींचा मिलाफ झाला

11. On the death of Qutb-ud-din Aibak his ………………, Iltutmish, was selected as Sultan.
    (A) Son
    (B) Brother
    (C) Son-in-law
    (D) Nephew

12. The founder of Sayyad dynasty, Khizra Khan (1414-21), was the native of .............
    (A) Dipalpur
    (B) Chanderi
    (C) Kara
    (D) Multan

13. Robert Sewell's book 'A Forgotten Empire' is primarily based on ..... ............. sources.
    (A) Sanskrit and Telugu
    (B) Kannada and Telugu
    (C) Persian and European
    (D) Telugu and Persian

14. Who completed the construction of Bibi ka Makbara ?
    (A) Muazzam
    (B) Azam Shah
    (C) Aurangzeb
    (D) Kam Baksha

11. कुतुबुद्दीन ऐबकाच्या मृत्युनंतर त्याचा ……… इल्तुत्मिश याची सुलतान म्हणून निवड झाली.
    (A) मुलगा
    (B) भाऊ
    (C) जावई
    (D) पुतण्या

12. सय्यद राजघराण्याचा संस्थापक खिझरा खान (1414-21) मूळचा ………… इथला होता.
    (A) दिपालपूर
    (B) चंदेरी
    (C) कारा
    (D) मुलतान

13. रॉबर्ट सेवेल यांचे 'अ फरगॉटन एम्पायर' हे पुस्तक मुख्यत्वे ……………………… स्रोतांवर आधारलेले आहे.
    (A) संस्कृत आणि तेलुगू
    (B) कन्नड आणि तेलुगू
    (C) फारसी आणि युरोपीय
    (D) तेलुगू आणि फारसी

14. बिबी का मकबराचे बांधकाम कोणी पूर्ण केले ?
    (A) मुअझ्झम
    (B) आझम शाह
    (C) औरंगजेब
    (D) काम बक्ष

15. According to Satish Chandra, what was the basic reason behind the conflict between Emperor Jahangir and Shah Jahan ?

(A) No ruler could afford to allow a noble or a prince to become too powerful

(B) Shah Jahan was Jahangir's stepson

(C) Shah Jahan always sought the backing of Nur Jahan

(D) Shah Jahan was insolent by nature

16. The cavalry strength of Chhatrapati Shivaji Maharaj according to the Sabhasad Bakhar was ............ *pagas* and ........... *siledars* at the time of his death in 1680.

(A) 45000 and 60000

(B) 40000 and 65000

(C) 55000 and 45000

(D) 60000 and 45000

15. सतीश चंद्र यांच्या मते, सम्राट जहांगीर व शहाशहाँ यांच्यातील वादाचे मुख्य कारण कोणते होते ?

(A) एखाद्या सरदाराने अथवा युवराजाने जास्त शक्तिशाली होणे कोणत्याही राज्यकर्त्याला परवडणारे नसते

(B) शहाजहाँ हा जहांगीरचा सावत्र मुलगा होता

(C) शहाजहाँ कायमच नूरजहाँकडून पाठिंबा मिळवायचा प्रयत्न करत होता

(D) शहाजहाँ स्वभावत: उन्मत होता

16. सभासद बखरीनुसार, छत्रपती शिवाजी महाराजांचे 1680 साली निधन झाले तेव्हा त्यांच्या घोडदळाचे संख्याबळ ................ पागे व ................ शिलेदार इतके होते.

(A) 45000 व 60000

(B) 40000 व 65000

(C) 55000 व 45000

(D) 60000 व 45000

17. Which contemporary Marathi poet described the attacking spirit (*Parakram*) of Queen Tarabai against Aurangzeb as *"Dilli Zhali Deenwani! Dillishache Gele Paani! Tarabai Ramrani! Bhadrakali Kopali!*

(A) Honji Bala

(B) Moropant

(C) Govind

(D) Saganbhau

18. While escaping and returning from Agra to Rajgarh who was not with Sambhaji Raje ?

(A) Ramchandrapant

(B) Kashipant

(C) Visajipant

(D) Krushnajipant

19. Battle of Rakshasbhuvan, 1763 was fought between .................

(A) Tipu Sultan and Nizam

(B) Sambhaji Maharaj and Aurangzeb

(C) Shahu Maharaj and Nizam

(D) Madhavrao Peshwa and Nizam

17. औरंगजेबाविरोधातील राणी ताराबाईंच्या पराक्रमाचे वर्णन कोणत्या समकालीन मराठी कवीने "दिल्ली झाली दिवानी! दिल्लीशाचे गेले पाणी! ताराबाई रामराणी! भद्रलोकी कोपली!!" असे केले होते ?

(A) होनाजी बाळा

(B) मोरोपंत

(C) गोविंद

(D) सगनभाऊ

18. आग्र्याहून सुटका करवून घेतल्यावर रायगडावर परतत असताना संभाजीराजांसोबत पुढीलपैकी कोण नव्हते ?

(A) रामचंद्रपंत

(B) काशिपंत

(C) विसाजीपंत

(D) कृष्णाजीपंत

19. 1763 चे राक्षसभुवन युद्ध खालीलपैकी कोणामध्ये झाले ?

(A) टिपू सुलतान आणि निजाम

(B) संभाजी महाराज आणि औरंगजेब

(C) शाहू महाराज आणि निजाम

(D) माधवराव पेशवा आणि निझाम

20. Match the following and choose an appropriate option :

**List I**

**(Historian)**

(*a*) G. H. Khare

(*b*) Sadashiv Athavale

(*c*) Vi. Ka. Rajwade

(*d*) Setu Madharao Pagadi

**List II**

**(His Work)**

(*i*) Marathe Va Aurangzeb

(*ii*) Marathyanchya Itihasachi Sadhne

(*iii*) Itihasache Tatvadnyan

(*iv*) Murtividnyan

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*ii*) | (*iii*) | (*i*) | (*iv*) |

21. Which description of Ibn Battuta about mango is not true ?

(A) Mango was of the size of a large pear

(B) Mango was entirely grown by seeding

(C) Mango was entirely grown by grafting

(D) People ate mango by cutting it with knife or simply suck it

20. खालील यादी I व यादी II यामध्ये जोड्या लावा आणि योग्य तो पर्याय निवडा.

**यादी I**

**(इतिहासकार)**

(*a*) ग. ह. खरे

(*b*) सदाशिव आठवले

(*c*) वि. का. राजवाडे

(*d*) सेतूमाधवराव पगडी

**यादी II**

**(त्यांचे ग्रंथ)**

(*i*) मराठे व औरंगजेब

(*ii*) मराठ्यांच्या इतिहासाची साधने

(*iii*) इतिहासाचे तत्त्वज्ञान

(*iv*) मूर्तिविज्ञान

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*ii*) | (*iii*) | (*i*) | (*iv*) |

21. आंब्याचे इब्न बतुताने केलेले वर्णन पुढीलपैकी कोणत्या वर्णनासारखे नाही ?

(A) आंबा हा मोठ्या पीअरच्या आकाराचा होता

(B) आंब्याचे झाड पूर्णपणे बियाण्यातून मोठे होते

(C) आंब्याचे झाड पूर्णपणे कलमाद्वारे मोठे होते

(D) लोक आंबा सुरीने कापून खात किंवा थेट चोखत असत

22. Who shifted the capital of Delhi Sultanate from Delhi to Agra ?
    (A) Abu Bakr
    (B) Mubarak Shah Sayyad
    (C) Sikandar Lodi
    (D) Bahlol Lodi

23. The Vijaynagar gold coin Hanumantarai Varaha is associated with ........
    (A) Anjaneri
    (B) Kishkindha
    (C) Panchwati
    (D) Chitrakut

24. Nanadesis were ..................
    (A) Foreign emissaries
    (B) Merchant guilds
    (C) Foreign soldiers
    (D) Neighboring farmers

25. According to Ain-i-Akbari the fine Muslin was manufactured in .......
    (A) Banaras
    (B) Dabhol
    (C) Sonargaon
    (D) Paithan

22. दिल्ली सल्तनतीची राजधानी दिल्लीहून आग्र्याला कोणी हलवली ?
    (A) अबु बक्र
    (B) मुबारक शाह सय्यद
    (C) सिकंदर लोदी
    (D) बहालोल लोदी

23. विजयनगरचे सोनेरी नाणे हनुमंतराई वराह .... शी संबंधित आहे.
    (A) अंजनेरी
    (B) किष्किंधा
    (C) पंचवटी
    (D) चित्रकूट

24. नानादेसी हे ................ होते.
    (A) परदेशी दूत
    (B) व्यापारी संघ
    (C) परदेशी सैनिक
    (D) शेजारील शेतकरी

25. ऐन-ए-अकबरीनुसार ............ इथे उत्कृष्ट मलमल तयार केली जात असे.
    (A) बनारस
    (B) दाभोळ
    (C) सोनारगाव
    (D) पैठण

26. Why did Akbar not respond to Abdullah Khan Uzbek's appeal of joint attack on Iran ?
    (A) A strong Iran was essential to keep the restless Uzbeks in their place
    (B) Akbar had matrimonial relations with the Shah of Iran
    (C) Abdullah Khan Uzbek was not trustworthy
    (D) The proposal of Abdullah Khan Uzbek could not fulfil Akbar's expectations of territorial gain

27. During which period Surat was the headquarters of East India Company ?
    (A) 1600–1612
    (B) 1615–1664
    (C) 1612–1674
    (D) 1612–1670

28. What was not a clause of the treaty of 1636 between the Mughals and Golconda ?
    (A) Qutub Shah agreed to include the name of Shah Jahan in the Khutba
    (B) Qutub Shah agreed to exclude the name of Iranian emperor from the Khutba
    (C) Qutub Shah agreed to be loyal with Shah Jahan
    (D) Qutub Shah agreed to surrender Mir Jumla to Auranzeb

26. इराणवर संयुक्त हल्ला करण्याच्या अब्दुल्ला खान उझबेकच्या आवाहनाला अकबराने प्रतिसाद का दिला नाही ?
    (A) अशांत उझबेकांना स्वतःच्या क्षेत्रात थांबवून ठेवण्यासाठी शक्तिशाली इराण आवश्यक होता
    (B) इराणच्या शाहाच्या घराण्याशी अकबराचे वैवाहिक संबंध होते
    (C) अब्दुल्ला खान उझबेक विश्वास ठेवण्यालायक नव्हता
    (D) अब्दुल्ला खान उझबेकाने मांडलेला प्रस्ताव अकबराच्या राज्यविस्ताराच्या अपेक्षांची पूर्तता करणारा नव्हता

27. कोणत्या कालखंडात सुरत हे ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्यालय होते ?
    (A) 1600–1612
    (B) 1615–1664
    (C) 1612–1674
    (D) 1612–1670

28. मुघल व गोवळकोंडा यांच्यात 1636 साली झालेल्या तहामध्ये कोणते कलम नव्हते ?
    (A) कुतुबशाहाने खुत्बामध्ये शहाजहाँचे नाव समाविष्ट करण्याला सहमती दर्शवली
    (B) कुतुबशाहाने खुत्बामधून इराणी सम्राटाचे नाव वगळण्याला सहमती दर्शवली
    (C) कुतुबशाहाने शहाजहाँशी एकनिष्ठ राहण्याला सहमती दर्शवली
    (D) कुतुबशाहाने मिर जुमला औरंगजेबाच्या ताब्यात द्यायला सहमती दर्शवली

29. Which contemporary source described the severity of the great famines (1630-31) in the following words, "grain has become costly and the gold is cheaper than grain".
    - (A) Badshahnama
    - (B) Shivbharat
    - (C) Saint Tukaram
    - (D) Saint Ramdas

30. Which one of the following statements about Maratha administration is not correct ?
    - (A) Patil was officer at village level
    - (B) Peth was an urban center having non-agricultural professionals
    - (C) Hisars were existing or erstwhile forts
    - (D) Chougula was officer at Pargana level

31. Which one of the following *mathas* (monasteries) was not founded by Shankaracharya ?
    - (A) Jagannatha Puri
    - (B) Dwarka
    - (C) Kedarnath
    - (D) Badrinath

32. ..................... built a Madrasah near Hauz-i-Khas and another at Siri.
    - (A) Iltutmish
    - (B) Balban
    - (C) Firoz Tughlaq
    - (D) Muhammad-bin-Tughlaq

29. ''धान्य महाग झाले आहे आणि सोने धान्यापेक्षा स्वस्त झाले आहे,'' अशा शब्दांत दुष्काळांची (1630-31) तीव्रता कशामध्ये वर्णन केली आहे ?
    - (A) बादशाहनामा
    - (B) शिवभारत
    - (C) संत तुकाराम
    - (D) संत रामदास

30. मराठ्यांच्या प्रशासनाबाबत पुढीलपैकी कोणते विधान यथातथ्य नाही ?
    - (A) पाटील गाव पातळीवरील अधिकारी होता
    - (B) पेठ म्हणजे शेतीव्यतिरिक्त व्यावसायिकांचा रहिवास असणारे नागरी केंद्र असे
    - (C) सध्याच्या किंवा जुन्या किल्ल्यांना हिसार म्हणत
    - (D) चौगुला परगणा पातळीवर्तुळ अधिकारी होता

31. पुढीलपैकी कोणत्या मठाची स्थापना शंकराचार्यांनी केली नाही ?
    - (A) जगन्नाथ पुरी
    - (B) द्वारका
    - (C) केदारनाथ
    - (D) बद्रीनाथ

32. .................... ने हौज-ए-खास आणि सीरी येथे मदरसे बांधले.
    - (A) अल्तमश
    - (B) बलबन
    - (C) फिरोझ तुघलक
    - (D) मुहम्मद बिन तुघलक

33. Which of the following Sufi scholars translated Suka-Saptati and Rati-Rahasya from Sanskrit to Persian ?
    (A) Khwaja Qutbuddin Bakhtiyar Kaki
    (B) Baba Farid
    (C) Khwaja Muinuddin
    (D) Khwaja Ziyauddin Nahkashabi
34. Sikh Guru ............. completed the compilation of Adi Granth Sahib.
    (A) Guru Nanak
    (B) Guru Arjan
    (C) Guru Govind Singh
    (D) Guru Angad
35. A new class of nobility called *Shamsi Nobles* was created by ..........
    (A) Balban
    (B) Muhammad Ghori
    (C) Iltutmish
    (D) Alauddin Khalji
36. In medieval India women were not usually involved in which of the following professions ?
    (A) Hawking milk and ghee
    (B) Building Construction
    (C) Corn Milling
    (D) Scribe

33. पुढीलपैकी कोणत्या सुफी संताने संस्कृत भाषेतील शुकसप्तती व रतीरहस्य यांना फारसीमध्ये भाषांतरित केले ?
    (A) ख्वाजा कुतुबुद्दीन बख्तियार काकी
    (B) बाबा फरीद
    (C) ख्वाजा मुइनुद्दिन
    (D) ख्वाजा झियाउद्दीन नखशाबी
34. शिखांचे गुरु .................. यांनी आदि ग्रंथसाहेबचे संपादन पूर्ण केले.
    (A) गुरु नानक
    (B) गुरु अर्जन
    (C) गुरु गोविंद सिंघ
    (D) गुरु अंगद
35. 'शम्शी सरदार' हा नवा उच्च वर्ग ......... याने निर्माण केला.
    (A) बलबन
    (B) मुहम्मद घोरी
    (C) अल्तमश
    (D) अलाउद्दीन खल्जी
36. मध्ययुगीन भारतात पुढीलपैकी कोणत्या व्यवसायात स्त्रिया साधारणपणे कार्यरत नसत ?
    (A) दूध आणि तूप विकणे
    (B) बांधकाम
    (C) धान्य दळणे
    (D) लेखनिक

37. In medieval India .............. industry employed the largest number of people after agriculture.
    (A) Mining
    (B) Textile
    (C) Leather
    (D) Perfume

38. Which were the most popular themes in Rajput Ragamala paintings ?
    (A) Episodes from Krishna's life
    (B) Scenes of Rajput wars
    (C) Seasons of the year, especially spring
    (D) Musical instruments

39. Madad-e-Maash was given to .......
    (A) Soldiers
    (B) Retired officers
    (C) Sufis and learned persons
    (D) Nobles

40. Kirtimukha occurs on the .............. of Maratha temples.
    (A) Door frames
    (B) Pillars
    (C) Outer walls
    (D) Shikhar

37. मध्ययुगीन भारतात शेतीच्या खालोखाल ...... या उद्योगामधून सर्वाधिक लोकांना रोजगार मिळत असे.
    (A) खाणकाम
    (B) वस्त्रोद्योग
    (C) चर्मोद्योग
    (D) सुवासिक द्रव्ये

38. राजपूत रागमाला चित्रकलेतील लोकप्रिय विषय कोणता ?
    (A) कृष्णाच्या जीवनातील प्रसंग
    (B) राजपूत लढाईतील प्रसंग
    (C) वर्षातील ऋतू, प्रामुख्याने वसंत
    (D) संगीत वाद्य

39. मदद-ए-माश ............ ला देत असत.
    (A) सैनिक
    (B) निवृत्त अधिकारी
    (C) सुफी व ज्ञानी व्यक्ती
    (D) सरदार

40. मराठा मंदिरांध्ये कीर्तीमुख ........... वर आढळते.
    (A) दाराच्या चौकटी
    (B) खांब
    (C) बाह्य भिंती
    (D) शिखर

41. Which was the only European country that did not prohibit or impose heavy duties on the import of Indian cotton goods ?

(A) France

(B) Germany

(C) Holland

(D) Belgium

42. Before 1857, the highest post in the civil administration of the East India Company that an Indian could occupy was :

(A) Sadr Amin

(B) Subhedar

(C) Mamlatdar

(D) Kamdar

43. Who set up the Society of Trade in the 1760s to distribute the profits of the Salt monopoly in fixed proportions according to ranks in the East India Company ?

(A) Robert Clive

(B) Warren Hastings

(C) Mir Jafar

(D) George Pigot

41. खालीलपैकी कोणता असा एकमेव युरोपियन राष्ट्र होता, ज्याने भारतातून येणाऱ्या कापसाच्या मालावर प्रतिबंध किंवा अधिक कर लादले नाही ?

(A) फ्रान्स

(B) जर्मनी

(C) होलँड

(D) बेल्जियम

42. 1857 पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या मुलकी प्रशासनात भारतीय व्यक्तीला जास्तीत जास्त हे पद मिळणे शक्य होते :

(A) सद्र अमीन

(B) सुभेदार

(C) मामलतदार

(D) कामदार

43. 1760च्या दशकात मिठाच्या मक्तेदारीमधून मिळणारा नफा ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांना हुद्द्यानुसार ठरावीक प्रमाणात वाढून देण्यासाठी सोसायटी ऑफ ट्रेड या व्यापारी संघाची स्थापना कोणी केली ?

(A) रॉबर्ट क्लाइव्ह

(B) वॉरन हेस्टिंग्ज्

(C) मीर जाफर

(D) जॉर्ज पीगो

44. The following Governor submitted a detailed 'Report on the Territories Conquered from the Peshwa' in October 1819 :
    (A) Sir Evan Nepean
    (B) Mountstuart Elphinstone
    (C) Sir John Malcolm
    (D) Sir Thomas Sidney Beckwith

45. The Gorkha War (1814-1816) and the Maratha War (1818) were fought in the tenure of the Governor-General named ....................
    (A) Lord Clive
    (B) Lord Wellesley
    (C) Lord Hastings
    (D) Lord Dalhousie

46. Which British Agent to the Mughal Emperor in Delhi was murdered in 1835 ?
    (A) Simon Fraser
    (B) William Fraser
    (C) Charles Metcalf
    (D) T. Fortescue

47. From amongst the following which was the first Indian state annexed under the Doctrine of Lapse ?
    (A) Jaitpur
    (B) Awadh
    (C) Satara
    (D) Udaipur

44. खालीलपैकी कोणत्या गव्हर्नरने ऑक्टोबर 1819 मध्ये पेशवाकडून जिंकलेल्या प्रांतांवर सविस्तर अहवाल सादर केला ?
    (A) सर ईवान नेपियन
    (B) माउंट स्टूअर्ट एलफिन्स्टन
    (C) सर जॉन मालकम
    (D) सर थॉमस सिडनी बॅकविथ

45. गुरखा युद्ध (1814-1816) आणि मराठा युद्ध (1818) खालीलपैकी कोणत्या गर्व्हनर जनरल च्या काळात झाली ?
    (A) लॉर्ड क्लाईव्ह
    (B) लॉर्ड वेलेस्ली
    (C) लॉर्ड हेस्टिंग्ज
    (D) लॉर्ड डलहौजी

46. 1835 मध्ये दिल्लीत मुघल बादशहाकडे असणाऱ्या कोणत्या ब्रिटिश प्रतिनिधीचा खून झाला ?
    (A) सायमन फ्रेझर
    (B) विलियम फ्रेझर
    (C) चार्लस् मेटकाफ
    (D) टी. फॉर्तेस्क्यू

47. राज्यसंस्थानांच्या खालसासिद्धांतानुसार खालीलपैकी कोणते राज्य सर्वप्रथम खालसा करण्यात आले ?
    (A) जैतपूर
    (B) अवध
    (C) सातारा
    (D) उदयपूर

48. In which year was the Province of Orissa created by carving out portions from Bihar, Madras and the Central Provinces ?

(A) 1919

(B) 1936

(C) 1932

(D) 1928

49. By which of the following Acts the province of Sindh was carved out of the Bombay Presidency ?

(A) The Act of 1909

(B) The Act of 1919

(C) The Act of 1935

(D) The Act of 1833

50. Dyarchy system was introduced by which of the following Act ?

(A) The Indian Councils Act, 1892

(B) The Indian Councils Act, 1909

(C) The Government of India Act, 1919

(D) The Government of India Act, 1935

51. The main items of export by the East India Company from the Deccan were :

(A) Cotton and sugar

(B) Jute and silk

(C) Rice and Mango

(D) Cereals and Jute

48. बिहार, मद्रास आणि मध्यप्रांतातील भाग तोडून ओरिसा हा प्रांत कोणत्या वर्षी निर्माण झाला ?

(A) 1919

(B) 1936

(C) 1932

(D) 1928

49. पुढीलपैकी कोणत्या कायद्याने मुंबई इलाक्यामधून सिंध प्रांत वेगळा काढला गेला ?

(A) 1909 चा कायदा

(B) 1919 चा कायदा

(C) 1935 चा कायदा

(D) 1833 चा कायदा

50. खालीलपैकी कोणत्या कायद्यान्वये दुहेरी प्रशासन प्रणाली सुरू करण्यात आली ?

(A) भारतीय कौन्सिल अधिनियम, 1892

(B) भारतीय कौन्सिल अधिनियम, 1909

(C) भारत सरकार अधिनियम, 1919

(D) भारत सरकार अधिनियम, 1935

51. खालीलपैकी कोणत्या वस्तू ईस्ट इंडिया कंपनीतर्फे निर्यात होत होत्या ?

(A) कापूस आणि साखर

(B) ज्युट आणि रेशीम

(C) तांदूळ आणि आंबा

(D) दाळी आणि ज्युट

52. The Bada Imambada of Lucknow was constructed as a part of the relief measures taken during :
(A) The Famine of 1784
(B) The Epidemic of Cholera in 1885
(C) The Famine of 1630
(D) The Plague epidemic of 1897

53. In 1882, Lord Ripon continued the policy of financial decentralization inaugurated under Lord Mayo. The following financial heads was not part of it :
(A) Imperial Heads
(B) Provincial Heads
(C) Divided Heads
(D) Trade Heads

54. In 1870, the London Times reported that ............ organised a public meeting in Bombay to protest against the rise in Income Tax.
(A) Madras Mahajan Sabha
(B) East India Association
(C) Bombay Association
(D) Poona Sarvajanik Sabha

55. The Bombay Tract and Book Society published a Marathi book entitled "Urus Va Yatresambandhi Jarimariyanvishayi Sambhashane" in ......................
(A) 1818
(B) 1832
(C) 1853
(D) 1860

52. .............च्या काळात लखनौमधील बडा इमामबाडा ही वास्तू आपत्कालीन साहाय्य योजनेतून बांधली गेली.
(A) 1784 चा दुष्काळ
(B) 1885 ची कॉलरा साथ
(C) 1630 चा दुष्काळ
(D) 1897 ची प्लेगची साथ

53. 1882 मध्ये लॉर्ड रीपण याने वित्तीय विकेंद्रीकरणाचे धोरण, ज्याचा आरंभ लॉर्ड मेयोने केला होता, पुढे विकसित केले. खालीलपैकी कोणते वित्तीय शीर्ष यामध्ये समाविष्ट नसते ?
(A) इंपिरियल शीर्ष
(B) प्रांतीय शीर्ष
(C) विभक्त शीर्ष
(D) व्यापार शीर्ष

54. 1870 मध्ये लंडन टाइम्सने बातमी दिली होती की ........... या संस्थेने मुंबईत आयकरवाढीच्या विरोधात जाहीर सभा आयोजित केली होती.
(A) मद्रास महाजन सभा
(B) ईस्ट इंडिया असोसिएशन
(C) बॉम्बे असोसिएशन
(D) पुणे सार्वजनिक सभा

55. बॉम्बे ट्रॅक्ट एन्ड बुक सोसायटीतर्फे "उरूस व यात्रेसंबंधी जरीमरीयांविषयी संभाषणे" हे पुस्तक .......... मध्ये प्रकाशित केले गेले.
(A) 1818
(B) 1832
(C) 1853
(D) 1860

56. Name this social reformer who graduated from the Grant Medical College in Bombay and was the first Native Secretary of the Students' Literary and Scientific Society :
(A) Bhau Daji Lad
(B) Vishram Ramji Ghole
(C) Rakhmabai Raut
(D) R.G. Bhandarkar

57. Which of the following did criticise the University Act of 1904 commenting that the Indian Universities have become some of the world's most governmental institutions ?
(A) Hunter Commission
(B) Radhakrishnan Commission
(C) Saddler Commission
(D) Raleigh Commission

58. 'Deccan Rayat Association' at Nipani was established by ............
(A) Mahadev Govind Ranade
(B) Jotirao Phule
(C) Sayajirao Gaikwad
(D) Shahu Maharaj

59. 'Vidyakhatyatil Brahman Pantoji' was composed by ...........
(A) Baba Padamanji
(B) Mahatma Jotirao Phule
(C) Gopal Baba Walangkar
(D) Dasram

56. मुंबईच्या ग्रंट मेडिकल कॉलेजमधून पदवी घेऊन स्टूडंट्स् लिटररी एन्ड सायंटिफिक सोसायटीचे अध्यक्षपद भूषवणारी पहिली एतद्देशीय व्यक्ती कोण ?
(A) भाऊ दाजी लाड
(B) विश्राम रामजी घोले
(C) रखमाबाई राऊत
(D) रा. गो. भांडारकर

57. 1904 च्या विद्यापीठ कायद्यामुळे भारतीय विद्यापीठे जगातील सर्वाधिक सरकारी विद्यापीठांच्या पंक्तीत जाऊन बसली आहेत अशी टीका कोणी केली ?
(A) हंटर आयोग
(B) राधाकृष्णन आयोग
(C) सॅडलर आयोग
(D) रॅले आयोग

58. खालीलपैकी कोणी निपाणी येथे 'डेक्कन रयत' असोसिएशन'ची स्थापना केली ?
(A) महादेव गोविंद रानडे
(B) जोतिराव फुले
(C) सयाजीराव गायकवाड
(D) शाहू महाराज

59. खालीलपैकी कोणी 'विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी' लिहिले ?
(A) बाबा पदमनजी
(B) महात्मा जोतीराव फुले
(C) गोपाल बाबा वलंगकर
(D) दासराम

60. What are 'Native Newspaper Reports' ?
    - (A) Weekly Compendium of translated abstracts from local language press
    - (B) Reports of circulation of Newspapers in India and Africa
    - (C) Catalogue of Indian language Newspapers in the British library
    - (D) Classified files of seditious writings in Indian Press

61. Which of the following is not a part of Non-Cooperation movement ?
    - (A) Boycott of government schools
    - (B) Boycott of the courts
    - (C) Boycott of foreign cloth
    - (D) Boycott on payment of taxes

62. On 16 June, 1914 Balgangadhar Tilak was released after serving a prison sentence of ............. years at Mandalay.
    - (A) Five
    - (B) Six
    - (C) Seven
    - (D) Eight

60. नेटिव्ह न्यूजपेपर रिपोर्ट्स हे काय आहे ?
    - (A) स्थानिक भाषांमधील उताऱ्यांचे भाषांतर करून दर आठवड्याला तयार केलेला संग्रह
    - (B) भारत आणि आफ्रिकेतील वृत्तपत्रांच्या खपांच्या आकड्याचे वृत्तांत
    - (C) भारतीय भाषांमधील वृत्तपत्रांची ब्रिटिश लायब्ररीतील सूची
    - (D) भारतीय वृत्तपत्रांतील राजद्रोही लिखाणाबाबतच्या गुप्त संचिका

61. खालीलपैकी कोणती बाब असहकारितेच्या चळवळीत समाविष्ट नव्हती ?
    - (A) सरकारी शाळांवर बहिष्कार
    - (B) न्यायालयांवर बहिष्कार
    - (C) परदेशी कापडावर बहिष्कार
    - (D) कर भरण्यावर बहिष्कार

62. 16 जून, 1914 रोजी बाळगंगाधर टिळक यांची मंडालेतून ................ वर्षांच्या कारवासातून सुटका झाली.
    - (A) पाच
    - (B) सहा
    - (C) सात
    - (D) आठ

63. Which of the following statements is incorrect regarding Home Rule Movement ?
    (A) Lokmanya Tilak was tried in Bombay Presidency and won the case
    (B) Annie Besant was arrested after having lost her case in Madras
    (C) Phirozeshah Mehta opposed Tilak's re-entry into Indian National Congress
    (D) Lokmanya Tilak's court-case was not accepted by Mohammad Ali Jinnah as lawyer

64. According to Lokmanya Tilak, the Bhagavad-Gita propounds ..........
    (A) The Vinaya Yoga
    (B) The Karma Yoga
    (C) The Raja Yoga
    (D) The Bhakti Yoga

65. Bhagat Singh had helped which of the following libraries to acquire a unique collection of literature on revolution, particular those of Russia, Ireland and Italy.
    (A) Khalsa Library, Hoshiarpur
    (B) Jathedar S. Pargat Singh Sangeetak Library, Naiwala
    (C) Dyal Singh Public Library, Lahore
    (D) The Dwarkadas Library, Lahore

63. होम रूल चळवळीबद्दल खालीलपैकी कोणते विधान यथातथ्य नाही ?
    (A) मुंबई ईलाख्यात लोकमान्य टिळकांवर खटला चालवल्या गेला आणि टिळक जिंकले
    (B) खटला हरल्यानंतर ॲनी बेझंट यांना अटक करण्यात आली
    (C) फिरोज शाह मेहता यांचा टिळकांच्या राष्ट्रीय सभेमधील पुन: प्रवेशावर आक्षेप
    (D) लोकमान्य टिळकांचा न्यायालयीन दावा लढायला मुहम्मद अली जिन्ना तयार नव्हते

64. लोकमान्य टिळकांच्या मते, भागवत गीताची मूळ शिकवण हे आहे :
    (A) विनय योग
    (B) कर्म योग
    (C) राज योग
    (D) भक्ती योग

65. रशिया, आयर्लंड आणि इटली येथून क्रांतिकारी वाङ्मय आणण्यासाठी भगत सिंहने खालीलपैकी कोणत्या ग्रंथालयास मदत केली ?
    (A) खालसा ग्रंथालय, होशियारपुर
    (B) जातेदार एस. परगतसिंह संगीत ग्रंथालय, नैवाल
    (C) दयाल सिंह पब्लिक ग्रंथालय, लाहोर
    (D) द्वारकादास ग्रंथालय, लाहोर

66. Resolution on Fundamental Rights and Duties and Economic Program was passed in following session of Indian National Congress :
    (A) Guwahati, 1926
    (B) Delhi, 1923
    (C) Lahore, 1929
    (D) Karachi, 1931

67. Who hailed Gandhiji as being 'without doubt made of the stuff of which heroes and martyrs are made ?
    (A) Jawaharlal Nehru
    (B) Pherozeshah Mehta
    (C) Gopal Krishna Gokhale
    (D) Balgangadhar Tilak

68. After the partition, refugees who were artisans, traders and labourers were accommodated in new townships such as :
    (A) New Delhi
    (B) Faridabad
    (C) Faridkot
    (D) New Bomaby

66. मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये आणि आर्थिक कार्यक्रमाचे ठराव खालीलपैकी राष्ट्रीयसभेच्या कोणत्या अधिवेशनात पारित केले गेले ?
    (A) गुवाहाटी, 1926
    (B) दिल्ली, 1923
    (C) लाहोर, 1929
    (D) कराची, 1931

67. कोणी महात्मा गांधींमध्ये 'नायक आणि शहिदांचे गुण असल्याचे नि:संशयपणे म्हणता येईल', अशी स्तुती केली ?
    (A) जवाहरलाल नेहरू
    (B) फिरोझशाह मेहता
    (C) गोपाळ कृष्ण गोखले
    (D) बाळगंगाधर टिळक

68. फाळणीनंतर भारतात आलेल्या निर्वासितांपैकी कारागीर, व्यापारी आणि मजुरांसाठी ........ सारखी नवी नगरे उभारण्यात आली.
    (A) नवी दिल्ली
    (B) फरीदाबाद
    (C) फरीदकोट
    (D) नवी मुंबई

69. Members of the States Reorganisation Commission included a jurist, S. Fazl Ali, a Social Worker, H. N. Kunzru and a Historian .................. .

(A) K.M. Pannikar

(B) G.S. Sardesai

(C) N.V. Gadgil

(D) R.C. Mujumdar

70. MRTP Act (1969) was introduced for avoiding concentration of economic power in the hands of a few. The full form of MRTP is .................

(A) Mean and Real Tax Policy

(B) Monopoly and Realisation Trade Policy

(C) Monopolies and Restrictive Trade Practices

(D) Multiple Resources Trade Practices

71. Which Greek historian wrote on the Peloponnesian War, providing a detailed account of the conflict between Athens and Sparta ?

(A) Herodotus

(B) Thucydides

(C) Xenophon

(D) Aristophanes

69. राज्य पुनर्रचना आयोगाच्या सदस्यांमध्ये एस. फाझल अली हे विधिज्ञ, एच. एन. कुंझरू हे सामाजिक कार्यकर्ते आणि .................. हे इतिहासकार समाविष्ट होते.

(A) के. एम. पाणिक्कर

(B) गो. स. सरदेसाई

(C) न. वि. गाडगीळ

(D) आर. सी. मुजुमदार

70. काही थोड्या लोकांकडे आर्थिक सत्ता केंद्रित होऊ नये म्हणून एम. आर. टी. पी. (MRTP) कायदा 1969 मध्ये संमत झाला. M.R.T.P. (एम.आर.टी.पी.) :

(A) मिन अँड रिअल टेक्स पॉलिसी

(B) मोनोपॉली अँड रियलायजेशन ट्रेड पॉलिसी

(C) मोनोपॉली अँड रिस्ट्रिक्टिव ट्रेड पॉलिसी

(D) मल्टिपल रिसोर्सेस ट्रेड प्रक्टिसेस

71. पेलोपनेशियन युद्धावर, म्हणजेच अथेन्स आणि स्पार्टा यांच्यातील संघर्षावर, कोणत्या ग्रीक इतिहासकाराने तपशीलवार लिखाण केले आहे ?

(A) हेरोडोटस

(B) थ्युसीडिडीस

(C) झेनोफोन

(D) ॲरिस्टोफेन्स

72. According to R.G. Collingwood which historian is credited with the beginning of scientific history ?
   (A) Thucydides
   (B) Homer
   (C) Herodotus
   (D) Pliny

73. Which historian considered the gold coin of Jahangir called as Zodiac coin as fake ?
   (A) Jadunath Sarkar
   (B) S.N. Sen
   (C) G.H. Khare
   (D) G.S. Sardesai

74. Which contemporary post-modernist philosopher has questioned the 'epistemological value' of history as a science ?
   (A) Alun Munslow
   (B) Homi Bhabha
   (C) Hayden White
   (D) Keith Jenkins

75. What does the concept of "butterfly effect" suggest in the context of historical causation ?
   (A) Small events can have significant and unpredictable consequences
   (B) Large events always have minimal impact
   (C) Historical events follow a linear progression
   (D) External forces dominate historical outcomes

72. आर. जी. कॉलिंगवूड यांच्या मते वैज्ञानिक पद्धतीने इतिहासलेखनाची सुरुवात करण्याचे श्रेय कोणत्या इतिहासकाराला आहे ?
   (A) थ्युसीडिडीस
   (B) होमर
   (C) हेरोडोटस
   (D) प्लिनी

73. झोडियाक म्हणून संबोधले जाणारे जहांगिराचे सोनेरी नाणे बनावट असल्याचे कोणते इतिहासकार मानत होते ?
   (A) जदुनाथ सरकार
   (B) एस. एन. सेन
   (C) ग. ह. खरे
   (D) गो. स. सरदेसाई

74. पुढीलपैकी कोणत्या उत्तराधुनिक तत्त्वज्ञाने एक विज्ञान म्हणून इतिहास विषयाच्या ज्ञानशास्त्रीय मूल्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले ?
   (A) ॲलन मन्सलाव
   (B) होमी भाभा
   (C) हेडन व्हाइट
   (D) कीथ जेनकिन्स

75. ऐतिहासिक कार्यकारणभावाच्या संदर्भात ''फुलपाखरू परिणाम'' ही संकल्पना काय सुचवते ?
   (A) लहान घटनांचे महत्त्वपूर्ण आणि अप्रत्याशित परिणाम होऊ शकतात
   (B) मोठ्या घटनांचा नेहमीच कमीत कमी प्रभाव असतो
   (C) ऐतिहासिक घटना एका रेषीय प्रगतीचे अनुसरण करतात
   (D) ऐतिहासिक परिणामांवर बाह्य शक्तींचे वर्चस्व असते

76. Which of the following statement best captures the post-modern view of historiography ?
    (A) History is a subjective narrative constructed from diverse perspectives without any single, objective truth
    (B) History is the study of long-term structures, mentalities and the collective experiences of societies over time
    (C) History is a gradual progression towards enlightenment, liberal democracy and societal improvement
    (D) History is a reflection of power structures and ideologies, subject to social critique and examination

77. Who is the author of 'Elementary Aspects of Peasant Insurgency' ?
    (A) Sahid Amin
    (B) Partha Chatterjee
    (C) Ranjit Guha
    (D) Barun De

78. Which of the following is an example of a "challenge", as per Toynbee's theory ?
    (A) Economic prosperity
    (B) Technological innovation
    (C) Climate change
    (D) Internal peace

76. खालीलपैकी कोणते विधान इतिहासलेखनाच्या उत्तर-आधुनिकतावादी दृष्टिकोनाला उत्तम प्रकारे दर्शविते ?
    (A) इतिहास म्हणजे कोणत्याही एकमेव वस्तुनिष्ठ सत्याशिवाय, विविध दृष्टिकोनातून तयार केलेले व्यक्तिनिष्ठ भाष्य आहे
    (B) इतिहास म्हणजे दीर्घकालीन रचना, मानसिकता आणि समाजाच्या सामूहिक अनुभवांचा दीर्घकालीन अभ्यास
    (C) इतिहास म्हणजे प्रबोधन, उदारमतवादी लोकशाही आणि सामाजिक सुधारणेकडे हळूहळू प्रगती
    (D) इतिहास हा सामजिक समालोचन आणि परीक्षणाच्या अधीन, असलेल्या सत्ता-संरचना आणि विचारधारा यांचे प्रतिबिंब आहे

77. 'एलेमेंटरी आस्पेक्ट्स ऑफ पीझन्ट इन्सर्जन्सी' याचा लेखक आहे :
    (A) शाहीद अमीन
    (B) पार्थ चटर्जी
    (C) रणजीत गुहा
    (D) बरून डे

78. टॉयन्बीच्या सिद्धांतानुसार खालीलपैकी कोणते "आव्हान" चे उदाहरण आहे" ?
    (A) आर्थिक सुबत्ता
    (B) तांत्रिक नवकल्पना
    (C) हवामान बदल
    (D) अंतर्गत शांतता

79. Which intellectual tradition is closely associated with the Whig historians' view of history ?
    (A) Historicism
    (B) Positivism
    (C) Liberalism
    (D) Socialism

80. Which historian is associated with the Annales School and emphasized the importance of studying long-term historical structures and mentalities ?
    (A) Fernand Braudel
    (B) Jules Michelet
    (C) Eric Hobsbawm
    (D) Leopold von Ranke

81. Which of the following excavation methods is carried out for the excavation of megalithic stone circles ?
    (A) Vertical
    (B) Trial Trench
    (C) Horizontal
    (D) Quadrant

82. Which of the following sites is not an example of Chalcolithic site of Maharashtra ?
    (A) Bhokardan
    (B) Inamgaon
    (C) Jorwe
    (D) Savalde

79. कोणती वैचारिक परंपरा व्हिग इतिहासकारांच्या इतिहासविषयीच्या दृष्टिकोनाशी जवळून संबंधित आहे ?
    (A) इतिहासवाद
    (B) प्रत्यक्षार्थवाद
    (C) उदारमतवाद
    (D) समाजवाद

80. अनाल्स विचारसरणीशी संबंधित .......... या इतिहासकाराने दीर्घकालीन ऐतिहासिक संरचना व मानसिकतांचे महत्त्व अधोरेखित केले.
    (A) फेर्नांद ब्रॉदेल
    (B) ज्यूल्स् मिशेले
    (C) एरिक हॉब्सबॉम
    (D) लिओपोल्ड फॉन रांके

81. महापाषाणीय शिलावर्तुळांच्या उत्खननासाठी खालीलपैकी कोणती उत्खनन पद्धती अवलंबात आणली जाते ?
    (A) उत्सेध
    (B) चाचणी खड्डा
    (C) आयत
    (D) वृत्तपाद

82. खालीलपैकी कोणते स्थळ हे महाराष्ट्रातील ताम्रपाषाणीय स्थळाचे उदाहरण नाही ?
    (A) भोकरदन
    (B) इनामगाव
    (C) जोर्वे
    (D) सावळदे

83. Which of the following terms is used for identification of time in the Rigvedic period ?

(A) Gotra

(B) Gaveshana

(C) Gavishti

(D) Godhuli

84. What was the capital of Chedi Mahajanapada ?

(A) Champa

(B) Sotthivatinagara

(C) Pava

(D) Mithila

85. Which of the following dynasties is not mentioned in the Arya Manjushrimulakalpa, an important text preserving ancient historical records of Indian Buddhists ?

(A) Guptas

(B) Maitrakas

(C) Vakatakas

(D) Pushyabhutis

86. Amara Simha in his work titled 'Amarakosha' define itihas as ........

(A) Akhyana

(B) Itivrutta

(C) Purana

(D) Puravrutta

83. ऋग्वेदिक कालखंडात खालीलपैकी कोणती संज्ञा वेळेच्या ओळखीसाठी प्रचलित होती ?

(A) गोत्र

(B) गवेषणा

(C) गविष्टी

(D) गोधुली

84. चेदी महाजनपदाची राजधानी काय आहे ?

(A) चंपा

(B) सोत्थीवतीनगर

(C) पावा

(D) मिथिला

85. भारतीय बौद्धांचा ऐतिहासिक नोंदी जतन केलेल्या आर्य मंजुश्रीमूलकल्प या महत्त्वाच्या ग्रंथात खालीलपैकी कोणत्या राजवंशाचा उल्लेख आढळून येत नाही ?

(A) गुप्त

(B) मैत्रक

(C) वाकाटक

(D) पुष्यभूति

86. अमरसिंहाने त्याच्या अमरकोश नामक कृतीत इतिहास म्हणजे ............ असे विशद केले आहे.

(A) आख्यान

(B) इतिवृत्त

(C) पुराण

(D) पुरावृत्त

87. The Nigalisagar Pillar inscription of the Mauryan King Ashoka mentions the Stupa of ................ Buddha.
    (A) Kanakamuni
    (B) Shakyamuni
    (C) Amitabha
    (D) Vipassi

88. The second Buddhist council was held in the reign of king .............
    (A) Ajatashatru
    (B) Dhananand
    (C) Vitashoka
    (D) Kalashoka

89. The native chronicle of Sindh known as Chachnama was originally written in .................
    (A) Arabic
    (B) Sindhi
    (C) Persian
    (D) Sanskrit

90. Which of the following dynasties is not mentioned in the Rajatrangini ?
    (A) Karkotaka
    (B) Vakataka
    (C) Maurya
    (D) Kushana

87. मौर्य सम्राट अशोक यांच्या निगलीसागर स्तंभलेखात .................. बुद्धाच्या स्तुपाचा उल्लेख आढळून येतो.
    (A) कनकमुनि
    (B) शाक्यमुनि
    (C) अमिताभ
    (D) विपस्सी

88. द्वितीय बौद्ध संगिती ............ राजाच्या कारकीर्दित संपन्न झाली होती.
    (A) अजातशत्रू
    (B) धनानंद
    (C) वीतशोक
    (D) कालाशोक

89. सिंधचे स्थानिक इतिवृत्त चचनामा मूळतः ................... मध्ये लिहिले होते.
    (A) अरेबिक
    (B) सिंधी
    (C) पर्शियन
    (D) संस्कृत

90. खालीलपैकी कोणता राजवंशाचा राजतरंगिणीत उल्लेख प्राप्त होत नाही ?
    (A) कर्कोटक
    (B) वाकाटक
    (C) मौर्य
    (D) कुषाण

91. Which of the following methods is not an example of scientific method of archaeological exploration ?
    - (A) Magnetic Prospecting
    - (B) Lerichi Periscope
    - (C) Electrical Resistance Surveying
    - (D) Study of Place Names

92. The most important epigraphic evidence which proved historicity of the Gupta king Ramagupta is .......
    - (A) Durjanapur Jain Image Inscription
    - (B) Sanchi Buddhist Image Inscription
    - (C) Mathura Jain Image Inscription
    - (D) Deogarh Jain Image Inscription

93. The inscribed scutplural panel of the Mauryan king Ashoka was found at ......................... .
    - (A) Sanchi
    - (B) Bharhut
    - (C) Kanaganahalli
    - (D) Amaravati

91. पुरातत्त्वीय समन्वेषणाच्या वैज्ञानिक पद्धतीचे खालीलपैकी कोणती पद्धत उदाहरण नाही ?
    - (A) चुंबकीय सर्वेक्षण
    - (B) लेरिसी परिदर्शक
    - (C) विद्युतप्रतिरोध सर्वेक्षण
    - (D) स्थळांच्या नावाचा अभ्यास

92. गुप्त सम्राट रामगुप्त यांची ऐतिहासिकता सिद्ध करण्यासाठीचा सर्वात महत्त्वाचा अभिलेखीय पुरावा ......................... हा होय.
    - (A) दुर्जनपूर जैन प्रतिमा अभिलेख
    - (B) सांची बौद्ध प्रतिमा अभिलेख
    - (C) मथुरा जैन प्रतिमा अभिलेख
    - (D) देवगढ जैन प्रतिमा अभिलेख

93. मौर्य सम्राट अशोक यांचा अभिलेखित शिल्पयुक्त पट्ट ..................... येथे सापडला.
    - (A) सांची
    - (B) भरहूत
    - (C) कनगनहल्ली
    - (D) अमरावती

94. Which of the following inscriptions of the Mauryan king Ashoka mentions Sanghabheda ?
(A) Maski
(B) Rupanath
(C) Nittur
(D) Sarnath

94. मौर्य सम्राट अशोक यांच्या कोणत्या शिलालेखात संघभेदाचा उल्लेख येतो ?
(A) मास्की
(B) रूपानाथ
(C) नित्तूर
(D) सारनाथ

95. Which of the following Vedic sacrifices is not mentioned in the Naneghat inscription of the Satavahana queen Naganika ?
(A) Rajasuya
(B) Aptoryama
(C) Purushamedha
(D) Ashvamedha

95. सातवाहन सम्राज्ञी नागानिकेच्या नाणेघाट शिलालेखात खालीलपैकी कोणत्या वैदिक यज्ञाचा उल्लेख प्राप्त होत नाही ?
(A) राजसूय
(B) अप्तोर्याम
(C) पुरुषमेध
(D) अश्वमेध

96. The founder of the Kardamaka branch of the Western Kshatrapas was ..................... .
(A) Rudradaman I
(B) Nahapana
(C) Bhumaka
(D) Chashtana

96. पश्चिमी क्षत्रपांच्या कार्दमक शाखेचा संस्थापक ........................ हा होता.
(A) प्रथम रुद्रदामन
(B) नहपान
(C) भूमक
(D) चष्टन

97. According to the Junagadh inscription of king Rudradaman I, which of the following regions was not conqurered by king Rudradaman I ?
    (A) Surashtra
    (B) Aparanta
    (C) Vidarbha
    (D) Anupa

98. The Purananuru throws light on the history of ....................
    (A) Gangas
    (B) Mauryas
    (C) Pandyas
    (D) Kadambas

99. With which dynasty, the following sources associated–Terracotta sealing from Adam near Nagpur, coins from Ghantasala and the texts of Panini and Patanjali ?
    (A) Salankayana
    (B) Vishnukundina
    (C) Pallava
    (D) Shaka-Kshatrapa

100. Vakataka Queen Prabhavati Gupta looked after the Kingdom on behalf of her elderest son ............... .
    (A) Damodarasena
    (B) Pravarasena II
    (C) Devasena
    (D) Divakarasena

97. सम्राट प्रथम रुद्रदामन याच्या जुनागढ शिलालेखानुसार, सम्राट प्रथम रुद्रदामन याने खालीलपैकी कोणता प्रदेश जिंकला नाही ?
    (A) सुराष्ट्र
    (B) अपरांत
    (C) विदर्भ
    (D) अनूप

98. पुरननुरू ....................... यांच्या इतिहासावर प्रकाश टाकतो.
    (A) गंग
    (B) मौर्य
    (C) पांड्य
    (D) कदंब

99. खालील साधने-नागपूर जवळील अडम येथील मृण्मय मुद्रा, घंटासाला येथील नाणी आणि पाणिणी व पतंजली यांची ग्रंथे-कोणत्या राजवंशाशी संबंधित आहेत ?
    (A) सालंकायन
    (B) विष्णुकुंडिन
    (C) पल्लव
    (D) शक-क्षत्रप

100. वाकाटक सम्राज्ञी प्रभावती गुप्त यांनी थोरला पुत्र ..................... यांच्या वतीने राज्याकडे लक्ष दिले.
    (A) दामोदरसेन
    (B) द्वितीय प्रवरसेन
    (C) देवसेन
    (D) दिवाकरसेन

## ROUGH WORK